नि.दि.दा.क्र.१२२/२०१७
भरत वि. गंगाराम
नि.क्र.१०१

**मी सत्य प्रतिज्ञेवर शपथपूर्वक निवेदन करतो की,**

**प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र.२ यांची जबानी**

माझे संपूर्ण नाव – तुळशीराम माधवराव तोकले,

वय– ७५ वर्षे, व्यवसाय– शेती,

राहणार– गौर, ता. निलंगा, जि. लातूर

**प्रतिवादीकरीता अतिरिक्त सरतपास विधीज्ञ श्री. पी. एल. नरहरे यांच्या वतीने शपथेवर सुरू**

१. मी, प्रतिवादी नामदेव तोकले यांना माझी काही जागा विक्री केली आहे. तसे माझ्यामध्ये व प्रतिवादी नामदेव तोकले यांच्यामध्ये मुद्रांकवर लेखी झालेले आहे. तो मुद्रांक दाखविला तर तो मी ओळखू शकतो. दिनांक २१.१२.१९९६ रोजीचा खरेदीखत म्हणून असलेला मुद्रांक मला आता दाखविला, तो तोच आहे, त्यावर माझी लिहून देणार म्हणून सही आहे, त्यावर साक्षीदार म्हणून बब्रुवान चव्हाण व निवृत्ती सावंत, गोपाळ तावडे, गोपाळ चामे व गंगाराम यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. त्यावर लिहून घेणार म्हणून प्रतिवादी नामेदव यांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. तो (**नि.क्र.१०७**) वर आहे.

**सरतपास पूर्ण.**

**वादीकरीता उलटतपास विधीज्ञ श्री. ए. एस. माकणे यांच्या वतीने**

२. खरेदीखताचा मुद्रांक प्रतिवादी नामदेव यांच्या नावे घेण्यात आला होता. मुद्रांकावरील मजकूर कोणी लिहिला हे मला आठवत नाही. माझे व प्रतिवादी नामदेव यांच्यामध्ये खरेदीखत झालेले नाही, साक्षीदार पुढे स्वत: सांगतात तो खरेदी–विक्री व्यवहार मुद्रांकावर झालेला आहे. त्या

मुद्रांकवर दावा मिळकतीबाबतचा तपशील लिहिला नाही हे म्हणणे खरे नाही. खरेदी–विक्री व्यवहार मुद्रांक आधारे मी प्रतिवादी नामदेव यांच्या हक्कात काहीही दस्त करुन दिलेला नाही. विक्री केलेली जागा मला वाटपात मिळली होती. ते वाटप सन १९६९ ला झाले होते. ते वाटप लेखी स्वरुपात झालेली नाही. भरत तोकले यांनी किसन व व्यंकट यांची जागा खरेदी घेतली हे म्हणणे खरे आहे. दिनांक २१.१२.१९९६ ला मी प्रतिवादीस खरेदीखत करुन दिले नाही हे म्हणणे खरे नाही. मी किंवा प्रतिवादी नामदेव यांनी खरेदीखतासाठी केव्हाच मुदांक खरेदी केलेला नाही हे म्हणणे खरे नाही. वादी भरत यांनी दावा दाखल केल्यानंतर मी, प्रतिवादी नामदेव याच्या हक्कात खोटा मुद्रांक करुन दिला हे म्हणणे खरे नाही. प्रतिवादी नामदेव तोकले यांनी माझ्याकडून केव्हाच खरेदीखत करुन घेतले नाही हे म्हणणे खरे नाही. माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा आहे हे म्हणणे खरे नाही. मी, प्रतिवादी नामदेव तोकले यांच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे हे म्हणणे खरे नाही.

**<u>उलटतपास पूर्ण.</u>**

**<u>फेरतपास नाही.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by PANDE RAVI VIJAYPRASAD
Date: 2026.01.12 18:02:26 +0530

(रवि वि.पांडे)

दिनांक १२/०१/२०२६. दिवाणी न्यायाधीश, व.स्तर निलंगा,
जि.लातूर